# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXIV | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, MARCH 2022 | No. 02


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

नीतिसूत्रे ९७:१:९

१. परमेश्वर राज्य करितो; पृथ्वी उल्लासो; द्विपसमूह हर्षो.

२. ढग व घनमेघ त्यच्यासभोवती आहेत. नीति व न्याय त्याच्या सिंहासनाचा आधार आहेत.

३. त्याजपुढे अग्नि चालतो, तो आपल्या भोवतालचे शत्रु जाळून टाकितो.

४. त्याच्या विजांनी जग प्रकाशित केले; ते पाहून पृथ्वी कंपायमान झाली.

५. परमेश्वरासमोर, सर्व पृथ्वीच्या प्रभूसमोर पर्वत मेणाप्रमाणे वितळले.

६. आकाशाने त्याची नीति जाहीर केली; सर्व लोकांनी त्याचे गौरव पाहिले.

७. जे कोरीव मूर्तीची उपासना करितात, जे अवास्तव देवांचा अभिमान बाळगितात, ते सर्व लज्जित झाले. अहो सर्व देवहो; त्याच्या चरणी लागा.

८. हे ऐकून सीयोन हर्षित झाले; हे परमेश्वरा, तुझ्या न्यायकृत्यांमुळे यहूदाच्या कन्या उल्लासल्या.

९. कारण हे परमेश्वरा, तूं सर्व पृथ्वीच्याहून अतुच्च आहेस; सर्व देवांहून तूं परमथोर आहेस.

## द्राक्षवेल, अंजीर आणि जैतुन !

**The Vine, the Fig and the Olive!**

बंधु एम्. पॉलराज



ज्या प्रमाणे तामिळनाडू राज्यातील लोकांच्या जीवनांत भात, नारळ आणि केळी हि तीनहि झाडे/रोपे अविभाज्य भाग असल्यासारखी आहेत. तद्वतच द्राक्षवेल, अंजीर आणि जैतुन हि रोपे इस्राएल लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असल्यासारखी आहेत. इस्राएल हा प्रदेश डोंगर-दऱ्या यांनी व्यापिलेला आहे, जो स्वर्गातून आकाशातून पडणाऱ्या पावसाचे पाणी पितो. परंतु इस्राएली लोक ज्या मिसर देशशत ४३० वर्षे गुलामीत होते तेथील स्थिती अशी नाहि. मिसर देशात इस्राएल लोक मळ्यात बी पेरीत असत आणि पायांनी जमीन भिजवीत असत. तेथे जमीन आकाशातील पावसाला शोषून घेते. (अनुवाद ११:१०-११).

वरील तीनहि रोपे/झाडे हि इस्राएलमध्ये मुख्य आधार अशी आहेत. हे हबक्कुक ३:१७-१८ मध्ये लेखकाने जसे जाहिर केले आहे त्यावरुन स्पष्ट होते - ''अंजिराचे झाड न फुलले, द्राक्षाच्या वेलीस फळ न आले, जैतुनाचे उत्पन्न बुडाले... तरी मी परमेश्वराच्या ठायी हर्ष पावेन, मला तारण देणाऱ्या देवाविषयी मी उल्लास करीन.'' तो असे जाहिर करीत होता कि, ज्या सर्व गोष्टि जीवनाच्या आणि देशाच्या आधार देणाऱ्या आहेत अर्थ व्यवस्थेला ज्यात द्राक्षावेल, अंजीर आणि जैतुन समाविष्ट आहेत त्या जरी निष्क्रीय झाल्या तरी देखील मी परमेश्वराच्या ठायी हर्ष पावेन! हि तीनहि रोपे/झाडे इस्राएलला आधार अशी आहेत.

येशू ख्रिस्त त्याच्या सेवा काळात संदेशात या तीनहि रोपांचा/झाडांचा उल्लेख करीत असे. त्याने म्हटले, ''मी वेल आहे, तुम्ही फाटे आहा; जो मजमध्ये राहतो आणि मी त्याजमध्यें राहतो तो पुष्कळ फळ देतो; कारण मजपासून वेगळे असल्यास तुम्हाला काही करिता येत नाही.'' (योहान १५:५). इस्राएलमध्ये विवाह सोहळ्यात द्राक्षरस पाक-कृतित वाढण्यास येणारा महत्वाचा पदार्थ होता. आणि आपल्याला हे काना गावातील ज्या विवाह सोहळ्यात आमंत्रीतात येशू, त्याची आई आणि शिष्य होते. तेथे पहावयास मिळते. (योहान २:१-२) मत्तय २४:३२ या वचनात पाहातो, कि येशू अंजिराच्या झाडाला पाने फुटू लागली म्हणजे उन्हाळा जवळ आल्याचे चिन्ह समजले जाते. नोहाने जलप्रलय थांबल्या नंतर जेंव्हा दुसऱ्यांदा कबुतराला तारवा बाहेर सोडले तेंव्हा ते चोंचीत जैतुन झाडाचें नुकतेच खुडलेले पान घेऊन आले, त्यावरुन नोहाला समजले कि आता पृथ्वीवरचें पाणी ओसरले आहे.''

(ऊरवरीत पान ३ वर)

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

"...तूं देशांच्या उच्च स्थलांचे जयोत्साहानं आक्रमण करिशील, असे मी करीन; आणि तुझा पिता याकोब याच्या वतनाचा तुला उपभोग घेऊं देईन. परमेश्वराच्या तोंडचे हे शब्द आहेत." (यशया ५८:१४)



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

CHIEF EDITOR
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

ADMINISTRATION
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

EDITORIAL BOARD
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

E.mail ID
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

ख्रिस्तामधील प्रीय मित्रांनो,

आपल्या प्रभु आणि तारणाच्या येशू ख्रिस्ताच्या अतुल्य नामात प्रेमळ शुभेच्छा.

तुम्हि आणि तुमचे सर्व प्रीयजन देवाच्या कृपेद्वारे ठीक आहात, अशी आशा बाळगतो. मी आणि माझे सह-कर्मि तुम्हाला तुमच्या सर्व गरजांसहित दयेच्या राजासनासमोर दररोज उंचावित आहोत. आम्हाला ठाऊक आहे, की जगात सर्वत्र दुर्घटना घडत असल्यामुळे तुम्हांला देवाच्या विशेष संरक्षणाची गरज आहे. जगातील सर्व देशांतील लोक अतिशय भयग्रस्त स्थितीत जीवन जगत आहेत.

आम्हाला पुष्कळशा बंधु आणि बहिणीकडून प्रार्थना करण्याकरिता विनंत्या प्राप्त होत आहेत. आम्ही आमच्या कार्यालयात, पोस्टकार्ड, फोन, पत्र, ई-मेल इत्यादि माध्यमांद्वारे प्राप्त झालेल्या एकाहि विनंतीकडे दुर्लक्ष न करीता प्रत्येक विनंत्यांसाठी प्रार्थना करित आहोत. देव तुमच्या सारख्या प्रत्येक बंधु-बहिणींच्या जीवनात कार्यरत आहे.

जगात सर्वत्र पसरत असलेल्या संसर्गजन्य तापाच्या आणि सर्वसाधारण भितीच्या वातावरणामुळे सर्वत्र विश्वासणाऱ्या बंधु-बहिणींची आत्मिक प्रगती थंडावली किंवा कमी झाली आहे. तुम्ही त्यांच्या पैकी एक आहात कां?

तर ते चांगले नाहि. तुमच्या जीवनात भुतकाळात प्रार्थनेच्या द्वारे ज्या अनेक अद्भूत गोष्टि घडून आल्या होत्या तुम्ही त्यांचे स्मरण करावे. तुम्ही कदाचित तुमच्या रक्षणकर्ता प्रभु येशू ख्रिस्त याला, तुमच्या प्रार्थना न करण्याद्वारे, मंडळीला आणि तुमच्या पालकांना टाळल्या द्वारे, दशमांश आणि देण्यातील अविश्वासूपणामुळे दुखावले असेल किंवा विश्वासघात केला असेल. आता देव या संदेशाच्या द्वारे तुम्ही तुमच्या परिस्थितीतून बाहेर पडून पुढे पुढे जावे या साठी तुमच्या आत्म्यास हालवीत आहे.

देवानें या जगातील सर्व धोक्यांपासून, संकटातून तुम्हाला वाचविले आहे यासाठी आभारयुक्त अंत:करणाने तुमच्या आत्मिक कार्यक्रमास पुन:सुरवात करा. तो निश्चितच तुमच्या गरजा पुरविल. येणाऱ्या दिवसात फलदायी जीवन जगण्यास तो तुमचे मार्गदर्शन करील. आम्ही आमच्या प्रार्थनांद्वारे तुम्हाला पाठींबा देत आहोत.

जगात घडत असलेल्या सर्व घटना आपल्याला येशू ख्रिस्ताच्या जगाच्या न्याय करण्यास दुसऱ्या येण्याची आठवण करुन देत आहेत. आपण पैकी प्रत्येकाला न्यायासाठी त्याजसमोर उभे रहावे लागणार आहे. प्रभु येशू ख्रिस्तासाठी विश्वासू जीवन जगण्यासाठी स्वत:स त्याला समर्पित व्हा. देव करो आणि त्यासाठी तुम्हाला आवश्यक ती कृपा पुरवो.

कृपया **एको ऑफ हिज कॉल** सेवाकार्यासाठी प्रार्थना करणे आणि आधार देणे सुरु ठेवा. खरे तर तुमच्या प्रार्थनांची आणि आधाराची हिच एक फार मोठी गरज आहे. आम्ही आमचे सहकारी बंधु एम्. पॉलराज आणि पास्टर एम्. मुथ्थु त्यांच्या प्रकृतीस्वास्थाविषयीच्या

विशेष गरजे करिता तुमच्या प्रार्थनां अपेक्षित आहोत.

सध्या आमच्या मंडळ्या, शाळा, निवासी बायबल कॉलेज सुरु झालेल्या नाहित. जगातील सर्व लोकांची संसर्गजन्य तापापासून सुटका व्हावी व परिस्थिती पूर्ववत व्हावी यासाठी प्रार्थना करा.

तुमच्याकडे फावला वेळ असेल, तर आमच्या सेवा कार्यासंबंधीत ताज्या बातम्या आमच्या यू ट्यूब चॅनलवर पाहू शकता. आम्ही तुमच्यावर अतिशय प्रिती करितो आणि तुमच्या स्वस्थतेबद्दल उत्सुक आहोत.

देव तुम्हाला आर्शीवाद देवा.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858
E.mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन)

(उत्पत्ति ८:११) बल्हांडणाचे भोजन संपल्यानंतर, येशू आणि त्याचे शिष्य एक गीत गाऊन जैतुनाच्या डोंगराकडे गेले. (मार्क १४:२६). त्यावरुन स्पष्ट दिसते कि इस्राएल लोकांच्या जीवनातून द्राक्ष, अंजिर आणि जैतुन वेगळे करणे शक्य नाहि.

## द्राक्षवेल

"मिसर देशांतून तूं द्राक्षवेल काढून आणिला; आणि राष्ट्रांस घालवून देवून तो तेथे लाविला. तूं त्याकरिता जागा तयार केली आणि त्यानें मूळ धरुन देश व्यापिला.

त्याच्या छायेनें पर्वत, आणि त्याच्या फांद्यांनी परमेश्वराचें गंधसरु आच्छादित झाले.

त्यानें आपल्या फांद्या समुद्रापर्यंत आणि आपले फाटे फरात नदीपर्यंत लांबविले.

त्याचे कुंपणे तूं कां मोडिली?

**ह्यामुळे वाटेनें येणारे जाणारे सगळे त्याची द्राक्षें तोडितात.**

**रानडुकर त्याची नासधूस करितात, वनपशु त्याच्यावर आपला निर्वाह करितात.**

**हे सेनाधीश देवा, तूं माघारा फीर अशी आम्ही विनंति करितो; स्वर्गातून दृष्टि लावून पाहा व ह्या द्राक्षवेलाचें संगोपन कर;**

**जो रोपा तूं आपल्या हातानें लाविला, जी शाखा तूं स्वतांसाठी मजबूत केली तिचे संगोपन कर.**" (स्तोत्र ८०:८:१५)

येथे देवाने मिसर देशांतून द्राक्षवेल काढून आणिला; आणि कनान देशात लाविला. त्याने उत्तम फळ द्यावे अशी देवाची अपेक्षा होती! अरेरे, परंतु त्याने आंबट फळे दिली! त्याने आपले मुळे सर्व देशभर खोलवर रुजवली. आपला प्रभाव राष्ट्रावर पाडून परमेश्वराचे गंधसरु आच्छादिले; त्यामुळे देवाने त्याची कुंपणे मोडिली, त्यामुळे वाटेने येणारे जाणारे सगळे त्याची फळे तोडित, रानडुकरानी त्याची नासधुस केली, वनपशूंनी उपटून टाकिली, कारण परमेश्वराने त्याच्या सभोवतीचे कुंपण तोडिले. आसाप संदेष्टाने देवाला विनंती केली कि त्याने स्वर्गातून त्याजकडे पाहावे.

परमेश्वराचा द्राक्षमळा म्हणजे इस्राएलाचें धराणे" (यशया ५:७). देवाने त्याच्या निवडलेल्या लोकांना मिसरदेशातून जेथे ते गुलामगीरीत होते, त्यांना मोशेच्या पुढारपणात बाहेर आणिले. त्याने कनान्यांना देशातून बाहेर काढून स्वत:च्या लोकांना तेथे बसविले. तेथे ते दाविदाच्या पुढारपणात संख्येने बहुसंख्य झाले. आणि बलवान राष्ट्र बनले. त्याने शत्रूचा पराभव केला. त्याचे नाव दूरवरच्या देशांपर्यंत राष्ट्रांचा पुढारी असे पोहचले परंतु ते राष्ट्र शलमोन राजाच्या कारकिर्दीत, त्या परक्या स्त्रियाच्या नादाने तो परक्या देवाच्या आहारी गेला व राष्ट्राचा ऱ्हास होवू लागला. त्याच्या मुलाच्या रहेबामच्या काळात इस्राएल आणि यहूदा अशा दोन भागात दुभागले गेले.

इस्राएल लोकांनी शमरोन आणि यहूदाच्या लोकांनी यरुशलेम त्यांचे मुख्यालय केले. इस्राएलचा पहिला राजा यराबाम याने सोन्याचे दोन वासरु घडवून, एक दानमध्ये आणि दुसरे बैरशेव्वा येथे स्थानापन्न केले. आणि या गोष्टिचा पाठपुरावा केला की त्यांच्या या देवांनी त्यांना मिसरातून येथे आणिले, अशा रितीने ज्याने त्यांना फारोच्या दास्यातून सोडविले त्या देवाला नाकारीले. देवाने ज्या मोशे आणि अहरोन यांना इस्राएलांची सुटका करण्याकरिता निवडले होते, तरी देखील खऱ्या अर्थाने देवच त्यांचे नेतृत्व करित होता; तेथील राजांना घालवून देवून त्याने इस्राएली लोकांना कनानात बसविले. थोडक्याच समयात त्यांनी सर्वसामर्थी देवाला नाकारुन परक्या देवांना स्वीकारीले. त्यांनी देवांच्या मुर्ति जवळ-जवळ सर्व झाडांवर आणि उच्च स्थानी बसवून त्याची उपासना करु लागले. अशा या विश्वासघातकी कृत्यामध्ये, इस्राएल यहूदाच्या पुढे होता! देवाने क्रोधामुळे त्यांना विदेशी राजाच्या स्वाधीन केले! अशुऱ्यांनी ७२२ इ.स. पूर्वी इस्राएलवर ताबा घेतला आणि ५८६ इ.स. पूर्वी बाबेलोननी

**Statement about ownership and other particulars about the Newspaper Echo of His Call (Marathi) - Form IV (See Rule 8)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | : | **New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah Sahib 2nd Street, Chepauk, Chennai - 600 005.** |
| 2. Periodicity | : | **Monthly** |
| 3. Printer, Editor, Owner & Publisher | : | **S. Sam Selva Raj** (Same Address) |
| 4. Nationality | : | **Indian** |

I **S. Sam Selva Raj**, hereby that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

March 2022 **S. Sam Selva Raj.**

यहूदाचा ताबा घेतला. हे यासाठी घडून आले; कारण सर्वसामर्थी देवाला त्यागून ते अन्य देवांच्या मागे लागले. देवाने त्यांनी केलेल्या विश्वासघातामुळे त्यांचे संरक्षण काढून घेतल्यामुळे राज्यात पडलेला दगडाविटांचा ढीग पाहून आसाप संदेष्ट्याने विलाप केला.

ज्या द्राक्षवेलीकडून मधुर फळाची अपेक्षा होती. तीने आंबट फळ दिले आणि स्वत:चा नाश करुन घेतला.

आज देखील येशूच्या रक्ताद्वारे लोक देवाच्या कळपात (मेंढवाड्यात) येतात, थोडे दिवस प्रकाश झोतात रहातात आणि नंतर सैतानाच्या मंडळीची आवड धरतात. त्यांना याचा नेहमीच विसर पडतो की सैतान त्यांना नाशाकडे नेतो, कारण तो चोर आहे, जो चोरी, घात आणि नाश करितो. (योहान १०:१०). आपण जागरुक राहून सैतानाच्या सर्व कपट - लबाड्या यापासून स्वत:चे रक्षण केले पाहिजे तसे न केल्यास आपल्या पुर्वजांप्रमाणे आपल्याला देखील शिक्षेला सामोरे जावे लागेल.

द्राक्षावेल हि सर्वांना आवडणारी आणि हवी-हवीशी फळ देणार पीक आहे. ती ऋतुशी निगडीत अशी वेळ आहे. शेतकरी त्याकरिता जमीन खणून खत घालून तयार करण्यास अतिशय श्रम घेत असतो. वेल उगवल्यावर तो मंडपावर पसरू द्यावा लागतो. फळ न देणाऱ्या फाट्याला काढून टाकून केवळ फळ देणाऱ्या फाट्यालाच वाढू द्यावे लागते. शेतकरी/माळी अगदि अचुकपणे असे फाटे शोधीतो. येशूने योहान १५:१-२) या वचनात म्हटले, "मी खरा द्राक्षवेल आहे आणि माझा बाप माळी आहे. माझ्यांतील फळ न देणारा प्रत्येक फाटा तो काढून टाकितो, आणि फळ देणाऱ्या फाट्याला अधिक फळ यावे म्हणून तो त्या प्रत्येकाला साफसूफ करितो."

द्राक्षवेलीसारखीच विड्यासाठी वापरणाऱ्या पानांची वेल भारतातील अनेक ठिकाणी; आणि विशेषकरून तामिळनाडू मध्ये वाढविली जातात. त्यांची वाढ देखील द्राक्षीच्या वेलीप्रमाणेच होते. माझ्या एका नातेवाईकाचा अशा वेलीचा मळा होता. या मळ्याकरिता विशेष प्रकारे जमिनीची निवड केली जाते आणि तशीच विशेष काळजी घेऊन ती तयार केली जाते. ४ ते ५ फूट खोलवर अशी वरील जमीनीवरील माती बाजूला काढली जाते; त्यानंतर ज्या खालची जमीन व्यवस्थित खणून, त्यावर २ ते ३ फूटाचा इतर ठीकाणाहून आणलेली मातीचा थर मिसळण्यात येतो. इतर झाडांची मुळे या मळ्यात प्रवेश करणार नाहीत याची विशेष काळजी घेतली जाते. मळ्यात सरळ असे चर किंवा फाळ खणले जातात आणि ते खत व वाळू यांचे मिश्रण करुन भरले जातात. त्यांनतर त्या चऱ्यामध्ये अंतरा-अंतरावर पानाच्या फाट्याचा भाग लावला जातो. त्याला नियमित पाणी घालण्यात येते आणि पाणी सांचून राहाणार नाहि याची काळजी घेतली जाते. फाट्याला पालवी फुटते आणि ती वाढू लागते. वाढलेली वेल ताज्या काठीने आधारली जाते. या काठ्या साधारणता हलक्या किंवा बारीक झाडाच्या फांद्या असतात. उदा. कापूस, शेवगा आणि रानशेवगा या झाडाच्या असतात. कापसाचे झाड वाढल्यावर त्याला फळ येतात आणि त्यांची पूर्ण वाढ होते तेंव्हा जी सुकलेली व आंत कापसाने भरलेली असतात. कापूस उशी, गादी बनविण्याकरिता वापरला जातो. शेवग्याचे झाड आश्चर्य व्यक्त करण्याचे झाड आहे ते पाने आणि फळ देते. पानांचा उपयोग हिरवी भाजी करण्यासाठी कोवळी फळें सुकण्या अगोदर बाजारात विक्री करिता येतात. शेंगांचा पदार्थ हॉटेलांमध्ये आणि घरामध्ये बनविण्यात येते. रान शेवग्याचा केवळ खताकरिता उपयोग केला जातो. आणि त्याच्या बळकट-मजबुत खोडाचा उपयोग होडी किंवा 'कॅटामरना' बोट बनविण्यासाठी होतो. कांही लोक एक जोड उत्पन्न म्हणून केळीची लागवड करतात.

विड्याची ताजी पाने पैसे देणारे पिक म्हणन विचारात घेतली जातात. त्यांचा उपयोग औषधाकरिता देखील केला जातो. लोक त्याला चुना आणि कात लावून खातात. वयस्कर लोक त्याचा सवय म्हणून उपयोग करतात. कांहिजणांना तर त्याचे व्यसन लागलेले असते!

अशा प्रकारे मळ्यात शुद्धता राखण्याचा अटोकाट प्रयत्न करण्यात येतो. सर्वांनाच सर्वच वेळी आणि विशेषत स्त्रियांना प्रवेश दिला जात नाहि.

....Contd. to page 6


# नहेम्या बाईबल कॉलेज

**निवासी आणि सायंकाळीन कॉलेज**
**वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम**

ECHO OF HIS CALL 1968-2018 (ECHO GROUP)

माध्यम : हिंदी/इंग्लीश

Regd. Candidate for Membership ATA NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ECHO OF HIS CALL Estd. 1969

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र
**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि**
**वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**
**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**
**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**प्रार्थना स्तुति आणि मुद्दे १९ मार्च २०२२ ते १८ एप्रिल २०२२ पर्यंत**

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## स्तुति करिता मुद्दे

१९ मार्च : आमचे इंग्रजी मासिकाचे सहसंपादक प्रिय बंधु एम्. पॉलराज आणि नहेम्या बायबल कॉलेजचे अध्यक्ष पास्टर एम्. मुथ्थु यांच्या प्रकृति स्वाथ्याची देव काळजी घेत आहे त्याबद्दल देवाची स्तुति करुया.

२० मार्च : आमच्या पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेला बायबलकोर आणि थियोंलॉजीकल आभ्यासक्रम देव आशीर्वादित करीत आहे. स्तुती करु या.

२१ मार्च : १९६९ सालापासूनच्या मासिक प्रसिद्ध करण्याच्या सेवेस लाभलेल्या देवाच्या आशीर्वादाबद्दल स्तुती करु या.

२२ मार्च : मासिका द्वारे देव सुवार्ता न पोहचलेल्या भागांपर्यत ती पोहोचविणे शक्य होऊ देत आहे, त्याकरिता स्तुति करुया.

२३ मार्च : देवाने मागील महिन्यातील सर्व गरजा पुरविल्याबद्दल त्याची स्तुति करु या.

२४ मार्च : आमच्या बहुविविध कार्यक्रमाच्या माध्यांद्वारे आमचे वरिष्ठ पास्टरना शुभवर्तमान जाहिर करण्याच्या त्यांच्या समर्पितपणाबद्दल प्रभुची स्तुती करुया.

२५ मार्च : **एको ऑफ हिज कॉल**च्या आमच्या सर्व सहसंपादकांसाठी आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता स्तुति करा.

२६ मार्च : देवाच्या आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज**वरील आशीर्वादाबद्दल त्यांची स्तुति कर या.

२७ मार्च : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल**च्या स्टाफ, शिक्षक व प्रिन्सिपल यांच्या बद्दल स्तुति करु या.

२८ मार्च : आमच्या कुशल कारागीरामार्फत निर्विन्घपणे छपाईचे सतत काम करीत असलेल्या मुद्रणालयाकरिता देवाचे आभार मानू या.

२९ मार्च : आमच्या सर्व राज्य समन्वयकांकरिता व त्यांच्या कुटुंबियांकरिता स्तुति करुया.

३० मार्च : कोविड-१९ महामारीच्या समयातील **एको ऑफ हिज कॉल**च्या सेवा कार्याबद्दल देवाची स्तुति करुया.

३१ मार्च : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीव भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदारांबद्दल देवाची स्तुति करुया.

०१ एप्रिल : आमच्या मंडळीत देवाने अभिषेक केलेले असे नविन विश्वासणारे दिल्या बद्दल स्तुति करुया.

०२ एप्रिल : आमच्या देशाला सुरक्षित ठेविल्या बद्दल स्तुति करुया.

०३ एप्रिल : सर्व दुष्ट शक्तिपासून आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम. सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाला देव रक्षण करीत असल्या बद्दल आभार मानू या.

## प्रार्थने करीता मुद्दे

०४ एप्रिल : इंग्रजी मासिकाचे सहसंपादक बंधु एम. पॉलराज आणि नहेम्या बायबल कॉलेजचे अध्यक्ष पास्टर एम्. मुथ्थु यांच्या जलद प्रकृति स्वास्थ लाभावे यासाठी आग्रही प्रार्थना करु या.

०५ एप्रिल : जगातील सर्व देशांत ऐक्य आणि शांति असावी यासाठी प्रार्थना करुया.

०६ एप्रिल : आमच्या वरिष्ठ पाळकांना निर्विघ्नपणे त्यांचे आत्मचरित्र लिहून पूर्ण करिता यावे यासाठी प्रार्थना करा.

०७ एप्रिल : आमच्या संस्थाच्या आणि त्यामधील स्टाफच्या कुटुंबियांच्या लाभाकरिता प्रार्थना करा.

०८ एप्रिल : ऑनलाईन सुरु असलेल्या हिन्दी थियोंलॉजीकल अभ्यासक्रमाकरिता प्रार्थना करा.

०९ एप्रिल : **नहेम्या बायबल कॉलेज** करिता आणि त्याच्या विस्ताराकरिता प्रार्थना करा.

१० एप्रिल : देवाने जगभरात पसरलेल्या कोविड-१९ आणि ओमिक्रॉन महामरीचे संपूर्णपणे उच्चाटन करावे.

११ एप्रिल : जादुटोना करणाऱ्यांची आणि व्यसनाधिनच्या मुक्ततेकरिता प्रार्थना करा.

१२ एप्रिल : या महिन्यातील सर्व शारिरीक आणि आर्थिक गरजा देवाने पुरवाव्यात यासाठी प्रार्थना करा.

१३ एप्रिल : आमचा देश ऐक्यात आणि प्रगतित बलवान होत रहावा यासाठी प्रार्थना करा.

१४ एप्रिल : उत्तर भारतातील सर्व मिशनऱ्यांसाठी आणि त्यांच्या कल्याणाकरिता प्रार्थना करा.

१५ एप्रिल : शुभवर्तमान न पोहचलेल्या सर्व भागांत ते जाहिर करणे शक्य व्हावे यासाठी प्रार्थना करा.

१६ एप्रिल : सर्व धर्मियांच्या ऐक्याकरिता प्रार्थना करा.

१७ एप्रिल : आमचे सेवाकार्य सर्व प्रकारे, सर्वत्र वाढावे यासाठी प्रार्थना करा.

१८ एप्रिल : आमच्या कर्मचाऱ्यांचे पगार, छपाईचा कागद, टपाल खर्च, वाहान खर्च इत्यादि सेवकार्या संबंधीत खर्च पुरविला जावा यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

## द्राक्ष मळ्यातील अंजीराचे झाड!

एकदा येशू ख्रिस्ताला द्राक्षमळ्यात अंजीराचे झाड दृष्टिस पडले. त्यावर तो फळ शोधु लागला. परंतु ते झाड पुष्कळशा पानांनी भरलेले होते. त्या द्राक्षमळ्याचा मालक तीन वर्षा पासून त्या झाडाकडे लक्ष देऊन वाट पहात होता; परंतु झाडाला फळ कांहि आले नाहि. तेव्हा मालकाने माळ्याला म्हटले, ते तोडून टाक; भूमिला उगाच भार तरी कां असावा? माळ्याने मालकाला म्हटले; यंदाचेहि वर्ष ते असू द्या, म्हणजे मी त्याच्या भोवते खणून खत घालीन.

येशू फळ देण्याच्या किंवा परिणामकारिकतेच्या महत्त्वा बद्दल बोलत होता. त्याने हे लूक १३:६-९ या वचनातील द्राक्षमळ्यातील अंजीराच्या झाडाच्या दाखल्या द्वारे अधोरेखीत केले. अंजीराचे झाड द्राक्षमळ्यात लावणे कठीण काम होते. परंतु झाडाला त्याचे अस्तीत्व पटवून देण्यासाठी फळ देणे आवश्यक होते.

द्राक्षमळा इस्राएल लोकांना दर्शवितो; अंजीराचे झाड हे विदेशी ज्यांना इस्राएलांच्या खर्चाने चलन प्राप्त झाले. देवाची अपेक्षा होती कि या विदेशांनी फळ द्यावे. देवाचा नियमच होता; कि प्रत्येक चांगले फळ न देणारे झाड कापून टाकून ते अग्नीत टाकावे (मत्तय ३:१०). त्यामुळे विदेशांनी त्यांच्या अस्तीत्वाकरिता चांगले फळ दिलेच पाहिजे.

प्रभु येशू, जो माळी तो पित्याकडे विनंती करितो पित्याने अंजीराच्या झाडाला आणखीन एक वर्ष द्यावे, म्हणजे त्या कालावधीत तो त्या झाडाकडे अधिक लक्ष देईल, त्याला खत आणि इतर आवश्यक ते घालील. येथे घेण्यात येणारी विशेष काळजी, पवित्रआत्मा दर्शवितो, जो विश्वासणाऱ्याला वाढण्याकरिता आणि फळ देण्याकरिता मदत करतो. अधीक फळ देण्यासाठी येशू, लोकांनी त्याजमध्ये रहावे असे सांगतो (योहान १५:५).

देव पिता जो त्याच्या स्वर्गातील सिंहासनावर बसलेला आहे, त्याचे नेत्र सर्वांस पाहातात, त्याच्या पापण्या त्यांस अजमावितात (स्तोत्र ११:४) तो नितीमान न्यायाधिश आहे, तो जगाचा न्याय नितीमत्वानें आणि लोकांचा न्याय सत्याने करील.

कारण तो आला आहे; तो पृथ्वीचा न्यायनिवाडा करावयास तो आला आहे; तो जगाचा न्यायनिवाडा यथार्थतेने करील, लोकांचा न्याय सत्यतेने करील (स्तोत्र ९६:१३).

देवाकडे जगातील लोकांना (विदेश्यांना) अंधारातून बाहेर काढण्याकरिता एक विशेष योजना आहे. त्याने आपल्या एकूलत्या एक पुत्राला; येशू ख्रिस्ताला सैतानाला त्यांची किंमत भरुन देऊन त्याच्या बंधनातून सोडविण्याकरिता पाठविले.

जो कोणी वधस्तंभाकडे पाहातो आणि कबुल करितो कि येशू ख्रिस्त त्याला तारण्याकरिता वध:स्तंभावर मृत्यु पावला, तो त्याच्या पापांची क्षमा करितो आणि त्यांना स्वत:ची मुले/मुली बनवितो. (योहान १:१२; ३:१६).

देवाच्या हाताने पौलासारख्या बंडखोराला विदेशांना सुवार्ता गाजविण्याकरिता निवडीले. आपला देव सर्वांच्या तारणाची काळजी करितो; यासाठी कि एकाचा देखल नाश पावू नये. इस्राएल जे त्याचे स्वत:चे लोक, त्यांनी येशू ख्रिस्ताला मसीहा म्हणून स्विकारण्यास नकार दिला आणि ते मार्गातून भटकले. त्यांनी आपली हृदये कठीण केली. त्यामुळे ज्या प्रमाणे अंजीराच्या झाडाला द्राक्षमळ्यांत जागामिळाली, विदेशांकरिता तारणाचा मार्ग खुला झाला. प्रवेश झाल्यानंतर मात्र त्यांनी फळ दिले पाहिजे!

## जैतुनाचे झाड !

इस्राएल देशात जैतुन हे महत्त्वाचे पीक आहे. जैतुन आणि द्राक्षमळे हे इस्राएलमधील प्रत्येक भागातील मुख्य पीक आहे. जैतुन हे पैसे देणारे पीक आहे, कारण त्याच्या बीयांपासून तेल काढण्यात येते; आणि हे जैतुन तेल जगभरात प्रसिद्ध तेल आहे.

पवित्रशास्त्रात जैतुन तेल हे पैसे देणारे पीक आहे याचे उदाहरण पहावयास मिळते. इस्राएलातील एक प्रेषित कर्ज मागे ठेवून मृत्यु, पावला होता. कर्जदार त्याच्या विधवा स्त्रीकडे येऊन तिला कर्जफेडीकरिता त्रास देवू लागले. कर्जफेड न केल्यास दोन्ही मुलांना गुलाम म्हणून देण्याविषयी मागे लागले. काय करावे हे सुचेनासे झाल्यावर तीने अलीशा संदेष्ट्याकडे धाव घेतली व त्याला संपूर्ण स्थिती सांगितली. संदेष्टा तीला म्हणाला, "मी तुझ्यासाठी काय करु? तुझ्या घरात काय आहे? त्या गरीब स्त्रीने उत्तर दिले कि केवळ एक तेलाची कुपीच आहे." त्याने तीला म्हटले "जा आणि बाहेरुन आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून बरीचशी रिकामी भांडी मागून आण. मग घरात जाऊन दार बंद करुन सर्व भांड्यात तेल ओत. सर्व भांडीतेलाने भरली, मुलाने तीला म्हटले आता एक देखील भांडे रिकामे राहिले नाहि. आणि कुपीत तेल वाढावयाचे राहिले. संदेष्ट्याने स्त्रीला सांगितले जा तेल विकून आपले कर्ज फेड व जे शिल्लक राहील त्यावर आपला व आपल्या पुत्रांचा निर्वाह कर." (२ राजे ४:१-७)

पौल रोम ११:१७ या वचनात विदेशांचे तारण हे इस्राएलांच्या तारणाऱ्या येशूला नाकारल्यामुळे झाले असे दर्शवितो. "आता जर कांही फांद्या तोडून टाकिल्या, आणि तूं रानजैतून असता त्याच्या जागी कलमरुपे लाविला गेलास व जैतुनाच्या पौष्टिक मुळाचा आधार झालास."

पौल विदेशांचे तारण इस्राएलाच्या किमतीशी जोडतो. त्यासाठी जैतुनाच्या झाडाच्या कांही फांद्या तोडून टाकण्यात आल्या होत्या आणि त्यांच्या जागी रान जैतून झाडाच्या (विदेशी) फांद्या कलम करण्यात आल्या. येशू ख्रिस्ताने म्हटले, "...कारण यहूद्यांतूनच तारण आहे." (योहान ४:२२). पौलाने म्हटले, "... विदेशी लोकांचा भरणा आंत होईपर्यंत इस्राएल लोकांमधील कांही लोकांनी आपली अंत:करणे कठीण केली; आणि ते विदेशी लोकांचा भरणा आंत होइपर्यंत तेव्हा विदेश्यांनी हि तारण बळकावण्याची संधी न सोडता स्वत:स देव राज्यात प्रवेश

करण्यास तयार करावे.

देवाने त्याच्या लोकांना जगातून वेगळे केले आणि त्यांना विशेष भेटी दिल्या; ज्या इतरांसाठी नाहीत. तेव्हा, देवाकडून प्राप्त झालेले. पाचारण आणि भेटी या कायमस्वरुपी आहेत. (रोम : ११:२९).

मुक्त करणारा सीयोनांतून येईल; तो याकोबापासून अधर्म दूर करील.

विश्वासणारे वर घेतले जाण्याच्या घटने नंतर नाकारलेल्या इस्त्राएलांना पुन: एकदा देवाचे राज्य प्राप्त करण्याची संधी मिळणार. जेव्हा मंडळी वर घेतली गेली त्यावेळी चार देवदूत 'पृथ्वीच्या चार कोपऱ्यांवर उभे राहून पृथ्वीवरुन, व समुद्रावरुन वारा वाहू नये व कोणत्याहि झाडाला लागू नये म्हणून पृथ्वीच्या 'चार दिशा' धरुन ठेवीत होते. दुसरा एक देवदूत ज्याच्या जवळ सदाजीवी देवाचा शिक्का होता त्या मोठ्या वाणीने त्या चार दूतांना म्हणाला ''आमच्या देवाचे दास आहेत त्यांच्या कपाळावर आम्ही शिक्का मारीपर्यंत पृथ्वीला, समुद्राला व झाडांना उपद्रव करु नका. ज्यांच्यावर शिक्का मारण्यात आला होता त्यांची संख्या एकशे चवेचाळीस हजार होती. प्रत्येक वंशाचे बारा हजार या प्रमाणे ती होती. दान वंशाला यात गणीले नव्हते, त्याच्या जागी मनश्शे वंशाला स्थान देण्यात आले होते. हे शिक्का मारीलेले लोक महान संकटाच्या ३ १/२ वर्षाच्या काळात वर घेतले जातील. ज्या वेळेत ख्रिस्त विरोधी सर्व जगावर सत्ता गाजवील.

हे एकशे चवेचाळीस हजार लोक येशू ख्रिस्ताकरिता विशेष असे आहेत, कारण त्यांनी स्वत:स स्त्रीयांपासून अपवित्र किंवा भ्रष्ट केले नाहि. याचा अर्थ; त्यांनी प्रकटीकरणाच्या १७ अध्यायातील मोठ्या कळावंतीणीच्या जारकर्मापसून स्वत:स मलीन केले नाहि. त्यांनी राजासनासमोर नवे गीत गाईले; जे या पृथ्वीवरुन मुक्त केलेले १,४४,००० त्यांच्या शिवाय शिकता आले नाहि. ते कलावंतीमुळे भ्रष्ट झाले नव्हते आणि कोकरा जेथे कोठे जात होता, ते त्याच्या मागे मागे जात होते. हे मंडळी वर स्वर्गात घेतली गेल्यानंतरचा पहिल्या गटातील लोक.

वर घेतले जाण्याच्या समयी शुद्धतेचा आणि समर्पणाचा दर्जा त्यांना न मिळाल्यामुळे १,४४,००० यांना त्यागण्यात आले होते. परंतु ते देवाच्या वचनात आणि नियम यांमध्ये स्थिर होते आणि मुर्तिपुजेद्वारे भ्रष्ट झालेले नव्हते. त्यामुळे देवाने त्यांना विशेष कृति दिली - संधी दिली.

## तारणाची यहुदाला शेवटची संधी

वर घेतले जाण्याच्या समयी आणि एकशे चवेचाळीस हजारामध्ये ज्या यहुदाना नाकारण्यात आले होते, त्यांचे देखील तारण व्हावे याकडे प्रभु अजुनहि लक्ष देऊन आहे. देवाचे वचन सांगते ''कारण देवाला आपल्या कृपादानांचा व पाचारणाचा अनुताप होत नाहि.'' (रोम ११:२९).

त्यांनी जरी मसीहाला नाकारीले होते तरी देव विश्वासु होता :- ''आणि मी दाविदाच्या घराण्यावर व यरुशलेम-निवाश्यांवर कृपा व विनवणी यांच्या आत्म्याचा वर्षाव करीन आणि ज्या मला त्यांनी विंधिले त्या मजकडे ते पाहतील, एकुलत्या एका पुत्रासाठी शोक करावा तसे ते त्यासाठी शोक करितील, ज्येष्ठ पुत्राबद्दल जसा कोणी अत्यंत खेद करितील (जखाश १२:१०).

यहुदीयांनी जरी मसीहाला नाकारिले त्याच्यावर राग व्यक्त केला; तरी देवाला यहुदावर कृपेचा, नम्रतेचा आत्मा ओतणे देवाला आवडले आणि ते त्यांच्या चुकीबद्दल शोक करतील तथापि, शेवटच्या दिवसात, दोन त्रित्यांश लोक नष्ट होतील. (हे कदाचित ख्रिस्त विरोधकाच्या सत्तेच्या ३१/२ वर्षाचा दुसऱ्या भागात घडले) १/३ अग्नीतून वाचतील, म्हणजे भयंकर अशा परिक्षांतून वाचतील (जखाया १३:८-९)

(उरवरीत पान ९ वर)


## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, **Post Box 2957**
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
**Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,**
**Cell : 98410 71852, 95661 31858**
**E.mail : biblecor@yahoo.co.in**



## TAX EXEMPTION

Donations by any individual or organization from India to **Echo of His Call Educational Trust** are eligible for Income Tax exemption under Section 80G of the Income Tax Act. Official receipts will be issued for this purpose. Please make your Demand Drafts / Cheques / M.O. for such donations in favour of **Echo of His Call Educational Trust** and send to us.

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

### मला कसे वाढवले

माझा जन्म ३ जून, १९४९ सालात झाला. माझ्या कुटुंबात जन्मलेला मी पहिला मुलगा होतो. माझ्या आई-वडिलांची, आजी-आजोबांची आणि कुटुंबातील इतर सदस्यांची इच्छा होती की मी एक ख्रिस्ती धर्मगुरु बनावे. त्यामुळे त्यांनी प्रार्थनेत आणि बायबलच्या ज्ञानात वाढविले.



मंडळी मध्ये लहान मुलांकरिता जी शब्बाथ शाळा होती त्यामध्ये मला भाग घेऊ दिला जात होता. आमचे उपासना मंदीर भातशेतीच्या मध्ये होते; आणि तिथे पोहचण्याकरिता योग्य असे रस्ते नव्हते. तेव्हा माझे मामा मला त्यांच्या खांद्यावर बसवून रविवारी आणि इतर दिवशी देखील घेऊन जात असत. माझी आई आणि मावशी नेहमीच माझ्या सोबत असायच्या. माझ्या बालपणाचे शब्बाथ शाळा शिक्षक, रेव्ह. एलीआस, बेबी, डेझी, सिस्टर रत्नम्, ग्यानसेलवम, मावशी आणि ग्रेस या सर्वांनी मला प्रभु येशू ख्रिस्ता जवळ आणले. मी एक सामान्य आणि अशक्त प्रकृति असलेला मुलगा होतो. त्यामुळे माझे शिक्षक मजवर अधीक प्रेम करीत असत.

माझ्या आईचा मी भविष्यातील देवाच्या सेवकाला वाढवित आहे असा दृढ

**Echo of His Call - YouTube**

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks. – Editor

### ज्याला छोटी लेकरे आवडतात असा देव !

विश्वास होता. माझी जास्त काळजी घेणे म्हणजे देवाची सेवा करणे असे समजुन ती मी उपासना मंदीरात होणाऱ्या सकाळ, दुपार आणि संध्याकाळच्या उपासनांमध्ये भाग घेण्याकडे तिचा कटाक्ष असे.

माझी आई मला तीच्या शेजारी बसवित असे, मला गीते गाण्यास आणि देवाचे वचन लक्षपुर्वक ऐकण्यास उत्तेजन देत असे. त्या दिवसात रेव्ह. आय्.आर. एच्. ग्यानदासन हे नेय्युर मुख्य मंडळाचे प्रमुख पास्टर होते. त्यांनी माझे समर्पण केले आणि सॅम सेल्वा राज हे नाव दिले. त्यांनी, “हा बालक शमुवेल बाळासारखा वाढेल. तो एक धनवान व्यक्ति देखील होईल आणि देवाच्या प्रसिद्ध सेवकांपैकी एक होईल” असा आशीर्वाद दिला.

त्या दिवसात ख्रिस्त जन्म दिनाच्या समयात मी आणि माझे आई-वडील खुप आनंदात असत. लेकरे शास्त्र वचने पाठ करीत असत आणि तोंडपाठ म्हणून दाखवित असत व त्यांना बक्षिस मिळत असे. मी १९५२ साली चर्चमध्ये तोंडपाठ बोलून दाखविलेले वचन मला आठवते :-

“इतक्यात अकस्मात स्वर्गातील सैन्याचा समुदाय त्या देवदूताजवळ प्रगट झाला...” (लूक २:१३).

१९५६ साली, मी ७ वर्षाचा असताना आमचे पालक सन्माननिय मिस्टर देवदास यांच्या द्वारे देण्यात येत असलेला देवाचा संदेश ऐकत असताना पवित्र आत्म्याने स्वत: मोठ्या सार्मथ्याने मला प्रकट केले. देव मजवर प्रीति करितो, हे मी अतिशय स्पष्ट रितीने ऐकले. त्याचा माझ्या मनावरइतका जबरदस्त प्रभाव होता, कि मी मोठमोठ्यानें रडू लागलो. देवाची उपस्थिती मजमध्ये येत असल्याची संवेदना मला जाणवू लागली. माझी आई बारकाईने मजकडे लक्ष देऊन पहात होती.

उपासना संपल्यानंतर मी माझ्या आईला विचारिले. “आई, पाळक स्वर्गात जाऊन येशूला पाहू शकतील कां?” मी ताबडतोब बोललो, “मला देखील स्वर्गात जावयाचे आहे. तेथे मला येशूला पाहावयाचे आहे. आई, काय हे शक्य आहे?” आईने मला म्हटले, “ तू जर या जगात जीवन जगत असताना येशूवर विश्वास ठेविला आणि अंत:करणात त्याचा स्विकारले, तर तुझी इच्छा निश्चितच पूर्ण होई.”

अशा रीतीने, माझ्या आईने मला येशूचा माझा तारणारा म्हणून स्विकारल्यास मदत केली. त्या दिवसापासून मला मजमध्ये एक वेगळा आत्मा कार्य करीत असल्याचे जाणवू लागले आणि नेहमीच देवाची उपस्थिती जाणवू लागली.

मला कन्नातुविलयी मधील तामीळ भाषिक शासकीय शाळेत १ल्या इयत्तेत प्रवेश देण्यात आला. माझी आजी दररोज मला शाळेला घेऊन जावयाची आणि सुरक्षित घरी परत घेऊन येत असे. शाळेला जाण्यास निघत असताना माझी आई, उजवा हात माझ्या डोक्यावर ठेवून प्रार्थना करीत असे - “प्रिय देवा, आज माझा मुलगा जे कांही शिकणार आहे, ते भविष्यात तुझ्या राज्याच्या वाढीकरिता मदतीचे ठरु दे.”

शाळेतील शिक्षकांना देखील विश्वास वाटत होता की मी भविष्यात देवाचा सेवक होणार. त्यामुळे ते माझ्यावर प्रेम करुन मला उत्तम शिक्षण देत होते. परंतु तेव्हा खोडकर मुलगा होतो. त्या शाळेत ५व्या इयत्तेपर्यंत इंग्रजी शिकविले जात नव्हते.

१९५७, साली माझ्या मंडळीच्या शब्बाथ शाळेच्या मुख्य शिक्षिका, सिस्टर रेथना यांनी मला कळविले कि शास्त्रवचन पाठांतर स्पर्धेत माझे नाव घालण्यात आलेले

नाहि. त्यां म्हणाल्या ''जर प्रभुची इच्छा असली, तर पुढील तुला संधी मिळेल.''

मी अतीशय दु:खीत झालो आणि माझ्या आईला ते गोष्ट रडून सांगितली. माझ्या आईने मला सुचन देत म्हटले'' येत्या गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार या तीन दिवसासाठी रात्रीचे जेवण वर्ज कर, आणि येशू आपला पिता त्याजसमोर गुडघे टेकून मला सांगितलेले, ते सर्व त्याला सांग. तीने मला दोन गाणी देखील शिकविली.

**१) देवाला प्रिती करणारे लेकरु, अडचणीत घाबरत नाही पिंजऱ्यात सुरक्षित असलेल्या पक्षाप्रमाणे येशू त्याच्या सेवेकरिता तुला सांभाळील.**

**२) माझ्या जीवाच्या रक्षका, माझ्या मेंढपाळा!**
**माझ्या हृदयाच्या आनंदा!**
**तुझ्या निकट येण्या करिता**
**मी भावनाविवष होऊन पुढे येतो**
**।।धृ।।**
**बोल बोल मी प्रार्थना करितो तेव्हा!**
**तुझी इच्छा मला दाखीव, ती नुसार कृति करण्यासाठी**

**१) जे पाळीतात खऱ्या मुक्तिदात्याची आज्ञा**
**त्यांना त्यांच्या जीवाच्या सुख समाधानासाठी असते**
**हे स्थळ मला देखील मिळू दे**
**माझ्या प्रिया, माझी प्रार्थना ऐक.**
**- बोला**

**२) तुझे पाण्यांच्या प्रती असलेले प्रेम**
**विदित करु दे मला माझ्या स्वभावातून**
**कलवरीच्या आत्माने मला अभिषेक कर**
**या साठी कि जिंकता याव्या मला माझ्या लढाया**
**- बोला**

**३) माझ्या जीवनाचे सर्व दिवस**
**तू गेलेल्या मार्गाने मी चालेन**
**माझे ते सर्व स्वखुषीने देईन**
**हे मुक्तिदात्या, दे मला तुझी शक्ति**
**- बोला**

मी त्या तीन दिवसात हि गाणी गात होतो; आणि माझ्या मंडळीत ख्रिस्त जन्मदिनाच्या दिवशी शास्त्रवचन बोलून दाखविण्याची संधी मिळावी यासाठी अश्रु ढाळून प्रार्थना करीत होतो.

देवाने माझ्या प्रार्थनेला उत्तर दिल्याची हि पहिली वेळ होती. माझे कुटुंबिय त्या दिवशी पहाटे उपासनेला हजर राहाण्यास जात असताना, वाटेत आम्हाला आमचे पास्टर देवदास भेटले. त्यावेळी अचानक माझ्याकडे पाहून मला विचारले, या ख्रिस्त जन्मदिनी तुला कोणते वचन बोलून दाखविण्यास किंवा गाणे गाण्यास दिले आहे?'' माझ्या आईने उत्तर दिले ''नाहि, काहिच सांगण्यात आले नाही.''

मला पास्टर म्हणाले,'' इतर मुले केवळ एकच वचन बोलून दाखविणार आहेत, परंतु स्तोत्र २३ मधील सर्व वचने बोलून दाखवावयाची.'' मी सर्व सहा वचने पाठ केली आणि न चुकता उपासनेच्या वेळी बोलून दाखविली. त्यामुळे त्यांनी पहिल्या क्रमांकाच्या बक्षिसाकरिता माझी निवड केली आणि एक सुंदर अशा साबणाचा



डबा दिला. या घटनेने माझ्यात येशू ख्रिस्ता विषयी आनंद आणि धैर्य निर्माण झाले. प्रार्थने बद्दल माझ्या मनात दृढ विश्वास निर्माण झाला.

''मला हाक मार...'' (यिर्मया ३३:३) हे वचन मार्गदर्शक वचन झाले. त्या दिवसा पासून माझे प्रार्थनेमध्ये देवाबरोबर नाते जोडले गेले आहे.

*****

(पान ७ वरुन)

जे लोक, यहूदी किंवा यहूदीतर वर घेतले गेलेले असतील, ते सुदैवी. वर घेतले जाण्याच्या घटनेनंतर केवळ यहूदियांनाच देवराज्यात प्रवेश करण्याची संधी दिली जाईल. ते देखील संधीला बिलगून राहून कठीण परिक्षांतून पार गेल्यावर तेव्हा, आजच तारणाचा दिवस आणि येशू ख्रिस्ताला बिलगण्याची व त्याचे स्वत:चे लेकरु म्हणून वर घेतले जाण्याच्या घटनेत संधी मिळविण्याची वेळ आहे.

द्राक्षावेलीला इस्त्रएलाच्या जीवनात महत्वाचे स्थान आहे. तो खुप श्रम घ्यावे लागणारा उद्योग आहे. त्या मध्ये फार मोठ्या संख्येने लोक गुंतलेले आहेत. द्राक्षरसाचा विवाह होणाऱ्या घरात आणि इतर घरगुती कारणांसाठी फार मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो.

अंजीराचे झाड हे उंच वाढणारे झाड आहे, त्याच्या फांद्या सर्व बाजुला पसरतात. इस्त्राएलमध्ये त्यांची मोठ्या प्रमाणात वाढ केली जाते. भारतात देखील त्यांची वाढ करण्यात येते. त्याचा वापर मुख्य खाद्य म्हणून आणि औषध म्हणून केला जातो. ते झाड हंगामात फळ देते. एके दिवशी येशू आणि त्याचे शिष्य बेथाणी गावाच्या बाहेर गेले असताना येशूला भूक लागली. त्याला पानांनी भरलेले असे अंजीराचे झाड दिसले. येशूने त्यावर फळ शोधण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याला फळ काही आढळले नाही. तेव्हा त्याने त्या झाडाला, 'यापुढे कोणीहि तुझे फळ कधीहि न खावो'' (मार्क ११:१२-१४) असा शाप दिला.

द्राक्षमळ्यातील अंजीराचे झाड, हे विदेशीयांचे यहूदीयांबरोबर कलम करण्याचे प्रतिक आहे. तारण हे यहुदियांचे आहे, देवाने ते त्याच्या विपुल कृपेमध्ये ते विदेशीयांमध्ये पुढे वाढविले. विदेशीयांनी हि संधी बळकावून फळ दिले पाहिजे. अन्यत: त्यांना अग्नीत टाकण्यात येईल.

जैतुन हे उत्पन्न (पैसे) देणारे पीक आहे. त्याचा इस्त्राएलमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते. ते तेलाकरिता प्रसिद्ध आहे. ते स्वयंपाकाकरिता, प्रकाश देण्याकरिता आणि औषधी कारणासाठी वापरण्यात येते. ते जर चेहऱ्यावर सतत लावले गेले, तर चेहरा उजळतो.

''म्हणजे मनुष्याचें अंतकरण आनंदित करणारा द्राक्षरस, मुख टवटवीत करणारे

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

तेल, मनुष्याच्या जिवाला आधार देणारी भाकर ही तो उत्पन्न करो' (स्तोत्र १०४:१५)

चला आपण आपल्या देशासाठी द्राक्षवेल, अंजीर आणि जैतुन यांच्या प्रमाणे उपयुक्त बनु या, आणि यापेक्षा अधिक आपली सुटका करणाऱ्या आणि तारण करणाऱ्या येशू ख्रिस्ता करिता उपयुक्त बनु या! हालेलुया!

*****

## OUR BANK DETAILS:

**1. Bank : State Bank of India**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | Triplicane, Chennai-5 |
| Name | : | S. Sam Selva Raj |
| A/C No. | : | 1023 2934 679 |
| IFSC | : | SBIN 00 00 249 |
| SWIFT CODE | : | SBI NIN BB 455 |

**2. Bank : ICICI Bank**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | Anna Salai, Chennai-6 |
| Name | : | Echo of His Call |
| A/C No. | : | 6038 0502 2319 |
| IFSC | : | ICIC 000 6038 |

**3. Bank : State Bank of India**

(This Account is for Tax Exemption for Indians only )

| | | |
|---|---|---|
| Branch | : | Triplicane, Chennai-5 |
| Name | : | Echo of His Call Educational Trust |
| A/C No. | : | 1023 2923 805 |
| IFSC | : | SBIN 00 00 249 |

Google Pay: 98410 71858
PayPal : SAM SELVA RAJ
*****
E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"
on 12th MARCH 2022
If un-delivered please return to:
ECHO OF HIS CALL (MARATHI)
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

***JESUS LOVES YOU!***

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by S. Sam Selva Raj from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at Echo of His Call Printers, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: S. Sam Selva Raj.